नियमित दिवाणी दावा क्र.१०/२०१८
सुलभा नारखेडे -वि.-दिपक नारखेडे
**नि.क्र.१०८ खाली**

**<u>प्रतिवादी क्र.२ चा उलटतपास वादीतर्फे विधीज्ञ श्री.एस.आर. तारकसे यांचे मार्फत.</u>**

**नाव** :- राम निवा वराडे,

०७. माझे शिक्षण पदवीपर्यंत झाले आहे. मी प्रतिवादी क्र.१ याला जवळपास १२ ते १३ वर्षांपासून ओळखतो. प्रतिवादी क्र.१ हा माझ्या पत्नीच्या नातेवाईक असल्यामुळे मी त्याला ओळखतो. दिपकची वडीलांची आई ही माझ्या सासुची मावशी लागते. माझे लग्न सन २०१२ मध्ये झाले. लग्नानंतर मला दिपकच्या घरी जाण्याचे काम पडले नाही. दिपकचे आईवडील हे माकोडी ता. मोताळा येथील आहेत. माकोडीला प्रतिवादी क्र. १ चे घर आहे किंवा नाही हे मला माहीत नाही. मला त्याच्या आईवडीलांना भेटायचा योग आलेला नाही. दिपकचे वडील माझ्या लग्नाच्या आधी वारले होते. हे म्हणणे खरे आहे की, दिपकची आई दि.३०.०६.१९९४ रोजी मोताळा येथे तिच्या माहेरी वारली. दिपकच्या आईचे नाव शोभा शरद नारखेडे आहे. दिपकच्या आईच्या वडीलांचे नाव निवृत्ती रामभाऊ पाटील असून ते मोताळा येथे राहत होते. हे म्हणणे खरे आहे की, शोभाचा मृत्यु हा मोताळा येथे तिच्या वडीलांच्या घरी झाला असल्यामुळे तिच्या मृत्युची नोंद मोताळा ग्राम पंचायतला केली आहे. माझ्या लग्नात दिपक आला होता परंतु त्याच्याशी माझी वैयक्तीक भेट झाली नव्हती. लग्नानंतर मला व्यक्तीगत दिपकला भेटायची गरज पडली नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे मी जर असे म्हटले की, आजपर्यंत मला दिपकला भेटायची गरज पडली नाही तर हे म्हणणे खरे होईल. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, मी त्याला खरेदीच्यावेळी भेटलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, मी दि.०७.०३.२०१५ च्या खरेदीवेळी भेटलो होतो.

०८. मी मनोहर चोपडेला ओळखत नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्यातला व दिपकमधला खरेदीचा व्यवहार हा मनोहर चोपडेमार्फत झाला होता. सदर खरेदीच्या व्यवहाराच्यावेळी कोणीही दलाल नव्हता. खरेदीच्या वेळी दिपक हा माझ्याकडे प्लॉट विकत घेता का म्हणून विचारायला आला होता. त्यावेळेस त्याने मला दावा मालमत्तेचे कागद दाखविले नव्हते. मी घरी विचारणा केल्यानंतर सदर प्लॉट विकत घेण्यास होकार दिला. खरेदीच्या एक महिन्यापूर्वी आमच्यात दावा मिळकतीच्या संबंधाने बोलणी झाली. ती बोलणी माझ्या घरी चैतन्यवाडी येथे झाली होती. या बोलणीच्या वेळेस माझ्या पत्नीचे आईचे वडील

जे.के.किनगे हे हजर होते. त्या बोलणीमध्ये आमच्या दोघांमध्ये २ लाख ३० हजार इतकी किंमत ठरली होती. ती रक्कम मी टप्प्या टप्प्याने प्रतिवादी क्र.१ दिपकला दिली. मी खरेदीपर्यंत दिपकला दीड लाख रोखीने दिले होते व उर्वरित रक्कम ही खरेदीखतानंतर ३ ते ४ टप्प्यांमध्ये दिली होती. ती रक्कम मी २० ते ३० हजार अशी प्रत्येक टप्प्यात दिली. ती रक्कम देखील मी रोखीने दिली. मी तीन ते चार टप्प्यांत दिलेली रक्क्म ही किनगेंच्या मार्फत प्रतिवादी क्र.१ ला दिली. मी शेवटचा टप्प्यात दिलेली रक्कम ही खरेदीच्या सव्वा वर्षाने दिली. मी प्रतिवादी क्र.१ ला जे वेळोवेळी जे पैसे भरले त्याच्या पावत्या मी घेतल्या नाही.

०९. मी खरेदीच्यावेळी पुण्याला कंपनीत नोकरीला होतो. मी खरेदीपासून ते आजतागायत मी पुण्यातच राहतो. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, मी मध्ये चार ते पाच वर्षांकरिता मलकापुर येथे आलो होतो. साक्षीदार परत स्वतःहून सांगतो की, मी तीन वर्षांकरिता मधात मलकापुर येथे आलो होतो. मी शेवटचा पुण्याला सन २०१९ च्या सुरूवातीला गेलो.

१०. मी खरेदीच्यावेळी दिपकला दिलेली दीड लाखांची रक्कम ही माझ्या पगाराच्या रक्कमेतून माझ्या बँकेच्या खात्यातून दिली. मी माझ्याकडे त्यावेळी दीड लाख रुपये रक्कम असल्याचा मी बँकेचा खातेउतारा दाखल करु शकतो. ज्यावेळी दिपक पहिल्यांदा मला भेटला त्यावेळी जे.के.किंनगे हे त्याच्यासोबत होते. हे म्हणणे खरे आहे की, माझा प्रतिवादी क्र.१ सोबत जो खरेदीचा व्यवहार झाला त्या व्यवहारात जे.के.किनगे यांचा सक्रीय सहभाग होता. माझा जे.के.किनगेंसोबत चांगला परिचय आहे. निशाणी क्र.११० कडे असलेल्या खरेदीखतावर जे के किनगे यांनी साक्षीदार म्हणून सही केलेली नाही.

११. आता मी सध्या भाजीपाल्याचा व्यवसाय पुणे येथे करतो. माझी दिवसाची उलाढाल पाच हजार रूपयांच्या आत होते. मी निशाणी क्र.११० कडील खरेदीखत वाचलेले आहे. असे काही झाले नाही की, मी दावाजागेचा मोबदला म्हणून प्रतिवादी क्र.१ ला खरेदी तारखेपूर्वी रूपये ३,२१,०००/- घरीच नगदी रोख दिली. मी दावामिळकतीचे मालकीचे कागदपत्र खरेदीखत करण्याच्या एक दिवसापूर्वी बघितले. त्यावेळी मी सुलभा नारखेडे यांच्या नावाचा सातबारा उतारा, टॅक्स पावत्या व टॅक्स भरायचे नोटीसचे एक लेटर बघितले होते. तोच सातबारा उतारा हा खरेदीखताला जोडल्या गेला.

१२. हे म्हणणे खरे आहे की, खरेदीखतावेळी दिपक हा मलकापुर येथे एका हॉटेलमध्ये वेटरचे काम करित होता. दि.०७.०३.२०१५ पर्यंत दिपक नारखेडेचे माकोडी

येथे कोणतीही मालमत्ता त्याच्या नावाने राहिलेली नसल्याचे मला माहीत नाही. दिपकचे आईडील वारल्यामुळे तो जेथे जमेल तेथे काम करुन खायचा हे मला माहीत नाही. आता दिपक कोठे आहे हे मला माहीत नाही. मी खरेदीचा भरण्याचा शेवटचा टप्पा दिपकला दिल्यापासून माझा आणि त्याचा संपर्क नाही व तो कोठे राहतो व काय करतो हे मला माहीत नाही. सदर प्रकरण दाखल झाल्यानंतर देखील माझी दिपकशी भेट झाली नाही. भरण्याची उर्वरित रक्कम देण्यासाठी मला किनगे संपर्क करीत होते.

१३. किनगे हे खर्बडी येथे राहणारे आहेत. ते सन २०१७ मध्ये वारले. किनगे हे पशुवैद्यक होते. मी किनगेंची सही ओळखत नाही. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, त्यांनी माझ्यासमोर कधी सही केली नाही.

१४. दावा मिळकत ही सुलभा शरद नारखेडे यांनी निळकंठ पाटील यांच्याकडून विकत घेतली. ते खरेदीखत मला पाहण्यात आले नाही. हे म्हणणे खरे आहे की, वादी सुलभा नारखेडे यांनी दावा मिळकत ही निळकंठ पाटील यांच्याकडून दि.०४.०५.१९९३ रोजी विकत घेतली. हे म्हणणे खरे आहे की, खरेदीवरून सुलभा यांच्या नावाची नोंद सातबारा उता-यावर लागली व तसा सातबारा उतारा त्यांच्या नावाने चालत आला. आता मला निशाणी क्र.११४ दाखविण्यात आला. सदर दस्तानुसार / फेरफारनुसार दिपकच्या नावाची नोंद घेण्यात आली. हे म्हणणे खरे आहे की, ती नोंद वारस म्हणून घेण्यात आली. आता मला दि.१४.०२.२०१८ च्या मधील दस्त क्र.०२ दाखविण्यात आला. सदर दस्त हा दिपक याने तलाठ्याकडे सादर करुन त्याचे नावाचे फेरफार करुन घेतले किंवा कसे हे मला सांगता येणार नाही. निशाणी क्र.११० व ११४ कडील दस्त ज्यावेळेस झाले त्यावेळी तलाठी हे के.जी. राजपुत होते. निशाणी क्र.११० हे कोणी लिहीले, केव्हा लिहीले व कोठे लिहीले हे मला माहीती नाही. खरेदी नोंदविण्यावेळी मी जे.के. किनगे यांच्या बोलावण्यावरून मी दुय्यम निबंधक मलकापुर यांच्यासमक्ष हजर झालो.

१५. हे म्हणणे खरे आहे की, खरेदीखताचा दस्त नोंदविण्यासाठी त्यासोबत कोणकोणते दस्त मिळवावे लागले किंवा जोडवे लागले याबाबत मला काहीही कल्पना नाही. निशाणी क्र.११० कडील खरेदीखत हे ज्या दिवशी लिहील्या गेले त्याच दिवशी ते नोंदल्या गेले किंवा नाही हे मला आठवत नाही. निशाणी क्र.१२५ ते निशाणी क्र.१२९ कडे दाखल केलेल्या दस्तांबाबत मला काहीही माहीती नाही. सदर दस्त हे मला दिपकने खरेदीकरतेवेळी दिले होते. त्या दस्तांबाबत मला व्यक्तीशः काहीही माहीती नाही.

१६.		दिपकच्या आईचे लग्नाच्या आधीचे नाव शोभा निवृत्ती पाटील व लग्नानंतरचे नाव सौ. शोभा शरद नारखेडे असल्याबाबत मला काही कल्पना नाही. मी वादी सुलभा शरद नारखेडे यांना ओळखत नाही. दिपक यांच्या वडीलांचे पूर्ण नाव शरद रामभाऊ नारखेडे आहे. वादीच्या पतीचे नाव शरद रामदास नारखेडे आहे. शरद रामदास नारखेडे यांचे माकोडी येथे घर व इतर परिवार असल्याबाबत मला माहीती नाही. दावा दाखल केल्यानंतरही मी वादीबाबत कोणतीही चौकाशी केली नाही. दावा मिळकतीची पहिली नोंद ग्रामपंचायत दफ्तरी दि.३१.०३.२०१५ रोजी श्री किनगे यांनी करून घेतल्याबाबत मला माहीती नाही. खरेदी झाल्यानंतर मी दावा मिळकतीचा शेतसारा सन २०१६ मध्ये भरला होता. त्याची पावती माझ्याकडे आहे. ती पावती मी सदर प्रकरणात दाखल केली आहे. साक्षीदार परत स्वतःहून सांगतो की, मी ग्रामपंचायत कर भरलेला आहे शेतसारा भरलेला नाही. दावा मिळकत विकत घेतेवेळी शेतसारा किती होता हे मला सांगता येणार नाही.

१७.		निशाणी क्र.१३० ते १३२ या बनावट पावत्या आहेत किंवा नाहीत हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, निशाणी क.१३० व १३१ ह्या शेतसारा भरल्याच्या नमुन्यामधील पावत्या नाहीत व तत्कालीन तलाठी श्री के.जी. राजपुत यांच्याशी मी संगनमत केल्यामुळे त्यांनी मला सदरचे दोन्ही दस्त पुरविले. सन २०१६ मध्ये वादीचे पती ज्यावेळी शेतसारा भरायला आले त्यावेळी त्यांना दिपक व नंतर माझ्या नावाची नोंद झाल्याचे कळाल्याबाबत मला माहीती नाही. वादीने स्वतः पोलीस स्टेशन मलकापुर शहर येथे दिपकने खोटे दस्त तयार करुन दावा मिळकत मला विकल्याबाबत त्याची तक्रार पोलीस स्टेशनला दिली होती किंवा नाही हे मला माहीत नाही. त्या तक्रारीवरून कॉन्स्टेबल गजानन पाटील यांनी माझे बयाण नोंदवल्याचे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की, वादीने प्रतिवादी क्र.१ ते ३ यांच्या नावाच्या नोंदी रद्द करून मिळाव्यात म्हणून उपविभागीय अधिकारी मलकापुर यांच्याकडे अपील दाखल केले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्या नोंदी खरेदीखताआधारे झाल्या असल्यामुळे ते अपील खारीज झाले.

१८.		प्रतिवादी क्र.१ ची आई शोभा नारखेडे हिचे दुसरे नाव सुलभा नारखेडे होते हे दाखवण्याबाबत मी कोणताही दस्त पाहिलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, या प्रकरणातील सुलभा शरद नारखेडे या नावाची व्यक्ती फक्त वादी आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी, किनगे व तत्कालीन तलाठी के जी राजपुत असे आम्ही तिघांनी संगनमत करुन सुलभा शरद नारखेडे मयत झाली असून प्रतिवादी दिपक तिचा वारस असल्याची खोटी नोंद

केली व त्या नोंदीच्या आधारे निशाणी क्र.११० कडील खरेदीखत करुन दिले. हे म्हणणे खरे नाही की, वादी तक्रार करेल म्हणून मी दावा मिळकत प्रतिवादी क्र.३ ला विक्री करुन दिले. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकत प्रतिवादी क्र.३ ला विक्री करण्यापूर्वीपर्यंत बखळ / मोकळी पडली होती. हे म्हणणे खरे आहे की, मी प्रतिवादी क्र.३ ला दावा मिळकत खरेदी करुन दिल्यानंतर त्याने २०१६ मध्ये जागेचा ताबा घेतला. हे म्हणणे खरे नाही की, निशाणी क्र.११० कडील खरेदीखत करतेवेळी तारांचे कुंपन व लोखंडी अँगल होते. हे म्हणणे खरे आहे की, सन २०१६ मध्ये दावा मिळकतीच्या अनुषंगाने दिपक व माझ्या नावाच्या नोंदी दिसल्या त्यावेळी वादीने उपविभागीय अधिकारी, जिल्हाधिकारी, आयुक्त, लोकआयुक्त, महसुल मंत्री व मुख्यमंत्री यांच्याकडे लेखी तक्रारी केल्या. त्या तक्रारींवरून वादीला दिवाणी न्यायालयात दाद मागण्यास सांगितल्याचे मला माहीती नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादीच्या पतीचे नाव व आडनाव व प्रतिवादी क्र.१ चे वडीलांचे आडनाव याच्यात सार्धम्य असल्या कारणाने त्याचा गैरफायदा घेवून आम्ही दावा मिळकतीच्या खोट्या नोंदी लावून घेतल्या व त्या आधारे खोटी खरेदीदस्त नोंदवून घेवून दावा मिळकत ताब्यात घेतली. हे म्हणणे खरे नाही की, माझ्याविरुध्द कारवाई होवू नये म्हणून सदर प्रकरणात मी खोटा बचाव घेतला आहे व खोटा पुरावा सादर केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या शपथपत्रातील संपूर्ण मजकुर खोटा आहे व आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

Digitally signed by PARAG SATISH THAKARE
Date: 2026.01.02 05:59:12 +0530

दिनांक : ०२/०१/२०२६

**(पी.एस.ठाकरे)**
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर
मलकापूर.